कला अकादमी गोवा
पणजी-गोवा

कअ/हिंसंवि/२०२५-२६/६४०
दि. १७/०६/२५

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे जागतिक योग दिन व जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून शनिवार दि.२१ जून २०२५ रोजी "प्रतिभा" या मासिक संगीत सभेचे आयोजन करण्यात आले आहे. कला अकादमीच्या कृष्ण कक्षात दुपारी ठीक ३.३० वाजता मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन होईल. तदनंतर कार्यक्रमाची सुरुवात कु. उगम सावंत यांच्या शास्त्रीय गायनाने होणार आहे. तद्‌नंतर कु. कौशल कवळेकर हे तबला सोलो वादन सादर करतील. तबला वादनानंतर कु. शुभ पार्सेकर यांचे संवादिनी एकलवादन होईल. तद्‌नंतर कु. शिल्पा के., कु. मंजिरी फुटणकर व कु. नेहाली किनळकर ह्या विद्यार्थिनी भरतनाटयम् नृत्य सादर करतील व कार्यक्रमाची सांगता कु. आरुणी प्रभू, कु. साक्षी देशपांडे, कु. तनिशा आमोणकर, व कु. रिध्दिमा वेंगुर्लेकर यांच्या कथ्थक नृत्याने होणार आहे.

गायन-वादन सादरीकरणामध्ये सर्व कलाकारांना श्री. श्रीपाद च्यारी, श्री. भार्गवराम गर्दे व श्री. प्रज्योत ताम्हणकर यांची तबलासाथ तसेच कु. उत्कर्षा फोंडेकर व श्री. शुभम नाईक यांची संवादिनी साथसंगत लाभणार आहे. कथ्थक नृत्यासाठी सौ. वरदा बेडेकर व कु. विभा सिधये यांची पढंतची साथसंगत लाभणार आहे. तसेच भरतनाटयम नृत्यासाठी सौ. मंदिरा तिरोडकर या नटवंगमची साथ करणार असून विद्‌वान श्री. डि. आर. चेथनमुर्ती हे मृदंगमची साथसंगत करतील व डॉ. दिप्ता रुबसुंदरम् यांची गायन साथसंगत विद्यार्थ्यांना लाभणार आहे.

सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून सर्व संगीत रसिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभागातर्फे कळविण्यास येत आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)